VOL- XI ISSUE- III MARCH 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# आत्मनिर्भरतेसाठी नविन शैक्षणिक धोरण 2020 ची भूमिका : एक अभ्यास

**अर्चना व्ही. झांगडे**
संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड

**डॉ.बालाजी जी. गिरगावकर**
मार्गदर्शक,
सहयोगी सेवाभावी संस्था
अध्यापक महाविद्यालय, विष्णुपूरी नांदेड

**सारांश :**

*व्यक्तिचा सर्वांगिण विकास घडविणे हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे. शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक, सामाजिक अशा सर्व पैलूंचा विकास हा शिक्षणातून अभिप्रेत असतो हा परिपुर्ण विकास झाला, तर व्यक्ति आत्मनिर्भर बनू शकते. स्वावलंबी बनू शकतो यासाठी नविन शैक्षणिक धोरण 2020 हे कसे उपयुक्त आहे हे धोरण आत्मनिर्भरतेसाठी कशाप्रकारे मार्गदर्शक ठरते, महत्त्वाची भूमिका बजावते, हे जाणून घेण्यासाठी प्रस्तूत संशोधन विषयाचा विचार केलेला आहे. यासाठी वेगवेगळ्या शाळांमधून 50 विद्यार्थ्यांची सुगम यादृच्छिक नमूना निवड पद्धतीने निवडकरुन यांच्याकडून प्रश्नावल्या भरुन घेण्यात आल्या.*

*त्याचबरोबर शिक्षकांची निवड करुन त्यांच्यासाठी देखील प्रश्नावली बनविण्यात येऊन भरुन घेण्यात आल्या. यातून जो प्रतिसाद प्राप्त झाला, त्यावरुन माहितीचे विश्लेषण केले गेले. यासाठी टक्केवारी या सांख्यिकीय परिमाणाचा वापर केला गेला यावरुन संशोधिका पुढील निष्कर्षाप्रत पोहोचली. मातृभाषेतून शिक्षण दिले गेले तर विद्यार्थ्यांना कठीण सकल्पनांचे आकलन लवकर होते. इ. सहावी पासून इटर्नशिपसह व्यावसायिक शिक्षण सुरु केले गेले तर, विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये प्राप्त करण्यास मदत होईल. पर्यायाने विद्यार्थी आत्मनिर्भर बनू शकेल. असे शिक्षक प्रश्नावलीच्या विश्लेषणावरुन दिसुन आलेले आहे.*

*डिजिटल, ई.शिक्षणामूळे विद्यार्थ्यांना आपल्या अंगी असलेल्या क्षमतांचा विकास करण्यास संधी प्राप्त होते, हे विद्यार्थी प्रश्नावलीच्या विश्लेषणावरुन दिसून आलेले आहे.*

*व्यावसायिक शिक्षण लहानपणापासूनच प्राप्त झाले तर विद्यार्थी स्वावलंबी होण्यास मदत होईल, असे वि. प्रश्नावलीच्या विश्लेषणावरुन दिसून आलेले आहे.*

*याचाच अर्थ असा की, शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.*

*स्वावलंबनाचे धडे दिले जातात, तसेच व्यावसायिक क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत होते.*

*अशाप्रकारे व्यक्तिला शिक्षणातून आत्मनिर्भर बनण्यास मदत होते आणि नविन शैक्षणिक धोरण 2020 हे यासाठी अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडते.*

**प्रस्तावना :-**

शिक्षण हे जीवनाचे प्रमुख अंग आहे मानवाचा तिसरा डोळा आहे. समाज परिवर्तनाचे साधन आहे आणि म्हणूनच शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या आणि पयार्याने व्यक्तिच्या जिवनात खुपच महत्वाची भुमिका पार पाडते. शिक्षण हे विद्यार्थ्यांला आपला विकास साधण्यासाठी मदत करते, नव्हे शिक्षणानेच व्यक्तिचा सर्वांगित विकास होतो. तसेच सर्व प्रकारच्या म्हणजेच शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक भावनात्मक विकासासाठी शिक्षण हे महत्वाची भूमिका पार पाडते आणि म्हणूनच व्यक्तिला जर आत्मनिर्भर बनायचे असेल तर व्यक्तिला आपला विकास साध्य करण्यासाठी योग्य शैक्षणिक वातावरण प्राप्त झाले पाहिजे, त्यासाठी चांगल्या प्रकारची शिक्षण पद्धती अभ्यासक्रम एकंदरीतच, उच्च दर्जाचे शिक्षण प्राप्त होते गरजेचे आहे.

जसे कोठारी आयोगात असे म्हटले आहे की, शाळांच्या वर्ग खोल्यातून देशाचे भवितव्य, भविष्य घडत आहे, आकार घेत आहे. त्याचप्रमाणे बदलत्या काळानुसार, शिक्षणप्रणालीमध्ये देखील नव्याने बदल होणे गरजेचे आहे. आज सर्व जगभर कोरोनाचे प्रतिसाद उमटुन संपुर्ण जगाचीच जिवनशैली बऱ्याच प्रमाणात बदललेली आपणास दिसुन येते.

तर मग आधीची शिक्षण पद्धती, आजच्या काळात कोरोनानंतरच्या काळात बदलणे गरजेचे आहे. कारण कोरोनानंतर प्रत्येक देशाने स्वावलंबी बनणे गरजेचे ठरले आहे म्हणजेच आत्मनिर्भर बनणे आवश्यक ठरले आहे. पंतप्रधान मा.नरेंद्र मोदीजींचे देखील ब्रीद वाक्य आहे, "आत्मनिर्भर बना" या आत्मनिर्भरतेसाठी शिक्षण प्रणालीत आमुलाग्र बदल घडविणे गरजेचे आहे.

त्यानुसार नवीन शैक्षणिक धोरण या आत्मनिर्भरतेसाठी किती प्रमाणात उपयुक्त ठरते ते पाहणे क्रम प्राप्त ठरते.

**प्रथम आपण नवीन शैक्षणिक धोरण 2020 काय आहे हे थोडक्यात पाहूया :**

या धोरणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने 4 ऑगस्ट 2020 ला मंजूरी दिली. ज्यामूळे शालेय आणि उच्च शिक्षण या दोन्ही क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तनीय सुधारणांचा मार्ग निर्माण झाला. देशातील शालेय आणि उच्च शिक्षण प्रमाणालीमध्ये परिवर्तनात्मक सुधारणाचा मार्ग मोकळा करणे होय. हे धोरण 34 वर्षे जुन्या शिक्षणावरील राष्ट्रीय धोरण (NPE) , 1986 ची जागा घेईल. हे 21 व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे आणि ते 34 वर्षांचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NPE), 1986 ची जागा घेते. प्रवेश समान गुणवत्ता, परवडणारीता आणि जबाबदारी या मुलभूत स्तंभांवर बांधलेले आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण 2020 चे प्रमुख मुद्दे**

1) **शालेय शिक्षण :-**

- 2030 पर्यंत शालेय शिक्षणात 100% सकलनोंदणी प्रमाण (GER) सह पूर्व शालेय ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे उद्दिष्ट्य आहे.
- NEP 2020 शाळा बाह्य 2 कोटी मुलांना खुल्या शाळा प्रणालीद्वारे मुख्य प्रवाहात आणेल.
- मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रावर भर, शैक्षणिक प्रवाह, शाळांमधले अभ्यासक्रमेत्तर व्यावसायिक प्रवाह यांच्यात कोणतेही कठोर प्रथक्करण नाही; इयत्ता 6 वी पासून इंटर्नशिपसह व्यावसायिक शिक्षण सुरू होईल.
- किमान इयत्ता 5 वी पर्यंत मातृभाषा प्रादेशिक भाषेत शिकविणे, कोणत्याही विद्यार्थ्यांवर कोणतीही भाषा लादली जाणार नाही.
- सध्याची 10+2 प्रणाली अनुक्रमे 3-8,8-11,11-14 आणि 14-18 वर्षे वयोगटातील नवीन 5+3+3+4 अभ्यासक्रम संरचनेद्वारे बदलली जाईल.

2) **उच्च शिक्षण :-**

- उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रणाण 2023 पर्यंत 50% पर्यंत वाढवले जाईल; उच्चच शिक्षणात 3.5 कोटी जागा जोडल्या जाणार आहेत.
- नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची स्थापना उच्च शिक्षणामध्ये मजबूत संशोधन संस्कृती वाढविण्यासाठी आणि संशोधन क्षमता निर्माण करण्यासाठी सर्वोच्य संस्था म्हणून केली जाईल.
- महाविद्यालयांची संलग्नता 15 वर्षात टप्प्याटप्प्याने संपवली जाणार आहे आणि महाविद्यालयांना दर्जाबद्ध स्वायत्तता देण्यासाठी टप्प्यानुसार यंत्रणा स्थापन केली जाणार आहे.

**आत्मनिर्भरता म्हणजे काय हे थोडक्यात पाहूया :-**

जर एखादी व्यक्ति दुसऱ्यावर अवलंबून असेल, प्रत्येक कामात किंवा इतर गरजांसाठी विनवणी करीत असेल तर, ही त्या व्यक्तीसाठी मोठी कमतरता आहे. जर एखादी व्यक्ती स्वावलंबी असेल तर कोणत्याही

वेळी त्यांच्यावर कोणतीही अडचण किंवा समस्या उद्भवली तर तो स्वत:हून सोडवू शकतो.
स्वत: ऐवजी त्याला इतर कोणावरही अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.

आत्मनिर्भरता ही प्रत्येक व्यक्तीसाठी सर्वात मोठी आणि सर्वोत्तम गुणवत्ता आहे हा गुण व्यक्तीचा सर्वात मोठा आधार आहे. व्यक्तीच्या आर्थिक सामाजिक विकासासाठी ज्ञान आणि कौशल्ये या दोन बाबी फार महत्त्वाच्या भूमिकापार पाडतात.

**नवीन शैक्षणिक धोरण आणि आत्मनिर्भरता यांचा संबंध पाहूयात**

नवीन शैक्षणिक धोरण हे आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी कशा प्रकारे उपयुक्त ठरते ते पाहूयात ,

**व्यख्या :-**

**आत्मनिर्भरता :-** व्यक्तीने कोणत्याही बाबतीत इतरांवर अवलंबून न राहता स्वावलंबी बनणे..

**उद्दिष्ट्ये :**

1) आत्मनिर्भरता ही आजच्या जीवनप्रणालीत का आवश्यक आहे, हे माहिती करुन घेणे.
2) नवीन शैक्षणिक धोरणांची आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी भूमिका कोणती आहे हे जाणून घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे.

**संशोधन साधने :** प्रश्नावली

**नमूना निवड पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी यादृच्छिक नमूना निवड पद्धतीचा वापर केलेला आहे.

**सांख्यिकीय परिमाण :-**

प्रस्तुत संशोधनासाठी टक्केवारी या सांख्यिकीय परिमाणाचा वापर केलेला आहे.

**व्याप्ती :** प्रस्तुत हे इ. 5 वी ते 8 वी विद्यार्थ्यांइतके व्याप्त आहे.

**मर्यादा :- प्रस्तुत संशोधन हे इ. 5 वी ते 8 वी विद्यार्थ्यांपूरतेच मर्यादित आहे.**

**विश्लेषण व अर्थ निर्वचन :-**

विद्यार्थी व शिक्षक प्रश्नावलीचे विश्लेषण केले यासाठी टक्केवारी या सांख्यिकीय परिणामांचा वापर केलेला आहे. निवडलेल्या बहुतांश शिक्षकांनी मातृभाषेतून शिक्षण प्राप्त केल्यामूळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते, यास सकरात्मक प्रतिसाद दिलेला आहे.

तसेच 6 वी पासून इंटर्नशिपसह व्यावसायिक शिक्षण सुरू केल्यामुळे विद्यार्थ्यांना कौशल्ये प्राप्त करण्यास मदत होऊन विद्यार्थी आत्मनिर्भर होण्यासाठी सक्षम होईल, याबाबत शिक्षक प्रश्नावलीतून अधिकतम प्रतिसाद दिलेला आहे.

व्यावसायिक शिक्षण लहानपणापासूनच सुरू झाल्यामूळे विद्यार्थी स्वावलंबी होण्यास मदत होईल. या पर्यायास जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिलेला आहे. तसेच ई.शिक्षणामूळे विद्यार्थ्यांना आपल्या अंगी असलेल्या क्षमतांचा विकास करण्यास संधी प्राप्त होते हे विद्यार्थी प्रश्नावलीच्या विश्लेषणावरुन निदर्शनास आले आहे.

यावरून आपणास असे दिसून येते की, नवीन शैक्षणिक धोरण 2020 हे विद्यार्थ्यांना पयार्याने व्यक्तिला आत्मनिर्भर बनविण्यास अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**निष्कर्ष :-**

1) नविन शैक्षणिक धोरण 2020 हे विद्यार्थ्यांच्या अंगी आत्मविश्वास निर्माण करण्यास उपयुक्त ठरते.
2) विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यास उपयुक्त आहे.
3) मातृभाषेतून शिक्षण दिल्यामूळे संकल्पना लवकर समजण्यास मदत होते.

4) हे धोरण सूप्त गुणांचा विकास करण्यास उपयुक्त ठरते.
5) त्यामुळे आत्मनिर्भरता मिळण्यास प्राप्त होण्यास मदत होते.

**शिफारशी :-**

1) आत्मनिर्भरतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले जावे.
2) स्वावलंबनाचे महत्व पटवून देणारे उपक्रम शाळांमधून राबविले जावेत.

**समारोप :-**

व्यक्तिला आत्मनिर्भर असणे ही आजच्या काळाची गरज आहे आणि त्यासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन, माध्यम आहे.

व्यक्तिमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, व्यावसायिक कौशल्ये वृद्धिंगत करणे, तांत्रिक शिक्षण प्राप्त करणे ही काळाची गरज आहे.

आंतरराष्ट्रीय सामंजस्य, शांतता, सहकार्य ई. चे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देणे आणि त्याबाबतच्या क्षमता त्यांच्या अंगी विकसित करणे आवश्यक आहे, याद्वारेच विद्यार्थी आत्मनिर्भर बनेल, पर्यायाने व्यक्ति, समाज आणि राष्ट्र आत्मनिर्भर होईल आणि यासाठी शिक्षणाशिवाय अन्य पर्याय नाही.

शिक्षण हेच प्रभावी साधन, माध्यम आहे आणि यासाठी नवीन शैक्षणिक धोरण 2020 हेच या सर्व अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी व्यक्तिला आत्मनिर्भर बनविण्यासाठी अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**संदर्भसूची :-**

1) कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व – Maharashtratimes.com
2) आत्मनिर्भर भारत :- https//thesimplehelp.com/attmnirbhar bharat essay in Marathi.
3) PDF education for self reliance in
4) https: lawlex.orylertpedia/summary of new education policy-2020/25303/amp
5) NVSh.zorg-https:nvsh?.orgartialnew.nut
6) राष्ट्रीय शिक्षा निति योजना-national education policy-2022